# थरार डेक्कन सायक्लोथॉन स्पर्धेचा

## देश-विदेशातील ३०० हून अधिक अबालवृद्ध स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

'शाहूनगरी' कोल्हापुरात प्रथमच डेक्कन स्पोर्टस् क्लबच्या वतीने डेक्कन सायक्लोथॉन ॲडव्हेंचर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात देश-परदेशातील ३०० हून अधिक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'सुदृढ-बलवान भारत' हे ब्रीद घेऊन महिलांसह लहान मुलांनीही यात सहभाग घेतला. शिवाजी विद्यापीठ ते संकेश्वर आणि पुन्हा शिवाजी विद्यापीठ या मार्गावरून १२० कि.मी., ५० कि.मी. आणि २० कि.मी. अशा आंतराच्या स्पर्धा रंगल्या.

**यशस्वी स्पर्धक असे**

५० किमी. अंतर : पुरुष - १६ ते ३६ वयोगट : हेमंत लोहार (कोल्हापूर), किरण बंडगर (सांगली), सिद्धेश पाटील (कोल्हापूर). ३६ ते ५० वयोगट : रमा जाधव (सांगली), साजीद सय्यद (सांगली), जॉर्ज थॉमस (कराड). ५० वर्षांवरील : नितीन नारगोलकर (कोल्हापूर), राम बेळगावकर (कोल्हापूर), जीवनदास शहा (सातारा). महिला : १३ ते ३६ वयोगट : प्रतीक्षा चौगुले (कोल्हापूर), निशाकुमारी यादव (सांगली), मानवी पाटील (गडहिंग्लज). ३६ ते ५० वयोगट : शिल्पा दाते (सांगली), नेहा टिकम (पुणे), सुचित्रा काटे (कोल्हापूर). ५० वर्षांवरील : अंजली भालिंगे (पुणे).





**कोल्हापूर : १) स्पर्धेचे उद्घाटन कोल्हापूर स्पोर्टस् असोसिएशनचे अध्यक्ष मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचे अध्यक्ष विश्वविजय खानविलकर, सायकल असोसिएशनचे विजय जाधव, जयेश कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी आ. मालोजीराजे छत्रपती यांनीही ५० कि.मी. अंतराची रेस पूर्ण करून युवकांना निरोगी आरोग्यासाठी सायकलिंगचा संदेश दिला. (छाया : पप्पू अत्तार)**

- **'सुदृढ बलवान भारत' ब्रीद घेऊन सहभाग**
- **१२०, ५०, २० किमी अंतराच्या स्पर्धा**
- **विजेत्यांचा रोख रक्कम देऊन सत्कार**

यावेळी नगरसेवक रत्नेश शिरोळकर, कुलसचिव विलास नांदवडेकर, उद्योजक चंद्रकांत जाधव, जयदीप पवार आदी उपस्थित होते. डेक्कन क्लबचे अध्यक्ष उदय पाटील, उपाध्यक्ष जयेश कदम, संचालक अभिषेक मोहिते, वैभव बेळगावकर, अमर धामणे, अतुल पोवार, संजय चव्हाण, प्रशांत काटे, समीर चौगुले, राजू लिंग्रस आदींनी संयोजन केले.

२० कि.मी. : पुरुष : १५ ते ३० वयोगट : उज्ज्वल ठाणेकर, पृथ्वीराज शहापुरे, प्रथमेश गुप्ता (तिघेही कोल्हापूर). ३० ते ५० वयोगट : सुधीर नकाते (कोल्हापूर), निखिल नवंधर (सांगली), श्रीकृष्ण म्हाकवेकर (कोल्हापूर). महिला गट : १५ ते ३० वयोगट : श्रुती कुंभोजे. ३० ते ५० वयोगट : सुमित्रा खानविलकर, आरती संघवी (कोल्हापूर).

१२० कि.मी. : दिलीप माने (सांगली), सुदर्शन देवार्डेकर (कोल्हापूर), प्रकाश ओलेकर (सांगली), वेदांत हलर्नेकर (पुणे), ॲरॉन केन (मुळ लंडन, सद्या रा. पुणे), फ्लँक नेल्सन (पल्लीतुरा केरळ), अभिनात मुराली (पल्लामोडू केरळ), कैवल्य सनमुद्रा (पुणे).

बक्षीस वितरण महापौर सरिता मोरे, विशेष पोलिस महानिरीक्षक सुहास वारके, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. विजेत्यांना रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.




**कोल्हापूर : डेक्कन ट्रायथलॉन स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना गौरविताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व विशेष पोलिस महानिरीक्षक सुहास वारके. शेजारी डेक्कन स्पोर्टस्चे पदाधिकारी व मान्यवर.**

# करिअर निवडताना अभिरुची, क्षमतांचा विचार व्हावा

## डॉ. बागी; अभियांत्रिकी प्रवेश मार्गदर्शन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

करिअर निवडताना, अभिरुची, अभिक्षमता, व्यक्तिमत्त्व, बुद्धिमत्ता व इमोशनल इंटलिजन्स या घटकांचा एकत्रित विचार केल्यास यश निश्चित मिळेल, असा मौलिक सल्ला शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर लोकल सेंटर व शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया व करिअर मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. पी. व्ही. कडोले होते.

डॉ. बागी म्हणाले, ज्या क्षेत्रात जायचे आहे त्या क्षेत्रात उपलब्ध अभ्यासक्रमाची माहिती ठेवणे आवश्यक आहे. शैक्षणिक पात्रता, कौशल्य असणे गरजेचे आहे. विद्यार्थी व पालकांनी योग्य अभ्यासक्रम व शिक्षणसंस्था करिअरसाठी निवडावी, असे आवाहन त्यांनी केले.



**कोल्हापूर : अभियांत्रिकी प्रवेश कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. जयदीप बागी.**

**(छाया : पप्पू अत्तार)**

दुपारच्या सत्रात कृषी महाविद्यालयाचे अजय देशपांडे यांनी कृषी अभियांत्रिकी विषयावर, तर एस.बी. आकिवाटे यांनी वस्त्रोद्योग अभियांत्रिकीसंदर्भात मार्गदर्शन केले. पी.ए.प्रभू यांनी केंद्रीभूत अभियांत्रिकी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची नोंदणी, शाखा निवड, पसंतीक्रम देताना घ्यावयाची काळजी, फी सवलत, आवश्यक कागदपत्रे याची माहिती दिली. यावेळी डॉ. मनोज चव्हाण यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. एम. बी. चौगुले यांनी आभार मानले.

सकाळ

# अभियांत्रिकी शिक्षणात रोजगार संधी : डॉ. बागी

कोल्हापूर, ता. २ : कृषी, संरक्षण, पायाभूत सुविधांची उभारणी, दळणवळण, विज्ञान-तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रात अभियंत्यांनी मोठी कामगिरी बजावली आहे. त्यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा फायदा समाजातील शेवटच्या घटकालाही होतो. त्यामुळे देशाच्या विकासात अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्वच क्षेत्रात चांगल्या अभियंत्याला मागणी असते. अभियांत्रिकी शिक्षणानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान



अधिविभागप्रमुख डॉ. जयदीप बागी यांनी केले. अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया आणि करिअरच्या संधी या विषयावर झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते.

दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन केले होते.

यावेळी प्रा. पी. ए. प्रभू यांनी अभियंत्रिकी प्रवेशाबद्दलची माहिती दिली. पदवीका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश दिला जातो. याबाबतही त्यांनी माहिती सांगितली. सीईटीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. ऑनलाईन अर्ज कसा करायचा?, महाविद्यालयांचे पर्याय कसे निवडायचे? याची माहिती त्यांनी दिली. या वेळी सुमारे ३५० विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

डॉ. जयदीप बागी म्हणाले, ''कोणत्याही गोष्टीच्या निर्मितीत अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची असते. कृषी तंत्रज्ञान, संरक्षणासाठी अत्याधुनिक शस्त्रसामुग्री, दळणवळणाची साधने, माहिती आणि तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांचा विकास आणि सर्वच क्षेत्रातील मूलभूत संशोधन या गोष्टी अभियंते करत असतात.''

या वेळी दी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे कोल्हापूर सेंटर अध्यक्ष डॉ. पी. व्ही. कडोले, सचिव मनोज चव्हाण, पी. बी. देशपांडे, एस. एम. खतकल्ले, डॉ. महेश साळुंखे, डॉ. आर. जे. देशमुख आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
03/06/2019 Page No. 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 JUN 2019

तरुण भारत

# अभियांत्रिकीमध्ये नोकरीच्या अनेक संधी : डॉ. जयदीप बागी

प्रतिनिधी

कोल्हापूर

अभियांत्रिकीला आता महत्त्व नाही हा गैरसमज चुकीचा असून, राष्ट्र उभारणीमध्ये अभियांत्रिकीला अनन्य साधारण महत्त्व आहे. अभियांत्रिकीमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन, व्यावसायिक, तांत्रिक ज्ञान व कौशल्य विकसित केले जाते. त्यामुळे अभियांत्रिकीचे शिक्षण घेवून बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाला शंभर टक्के नोकरीची संधी मिळते. अभियांत्रिकीमधील विद्यार्थ्यांना बांधकाम, संगणक, फुड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रीकल आदी क्षेत्रात उज्वल भविष्य आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. जयदिप बागी यांनी केले.

दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) कोल्हापूर लोकल सेंटर व शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया व करिअरच्या संधीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात हे मार्गदर्शन शिबिर पार पडले.

डॉ. बागी म्हणाले, तंत्रज्ञान अधिविभागात केमिकल टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल सिव्हिल इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र, फुड टेक्नॉलॉजी आदी विषयाचे अभ्यासक्रम शिकवले जातात. या विषयांना प्रत्येकी ६० पटसंख्या असून, दरवर्षी जवळपास ९० टक्के जागा भरल्या जातात.

प्रा. पी. ए. प्रभू म्हणाले, सीईटीचा निकाल ४ जून रोजी असल्याने पुढच्या आठवड्यात प्रवेश प्रक्रिया जाहीर होईल. ऑनलाईन अर्ज कसा भरावा, अर्ज भरताना ऑप्शन कसा द्यावा, मेरीट लिस्ट जाहीर झाल्यानंतर आपला ऑप्शन कसा फ्रिज करावा यासह अन्य माहिती डॉ. प्रभू यांनी दिली. या मार्गदर्शन शिबिराला ३५० विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

यावेळी दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) कोल्हापूर लोकल सेंटरचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. कडोले, सचिव मनोज चव्हाण, आयईआयचे कमिटी मेंबर पी. बी. देशपांडे, एस. एम. खतकल्ले, डॉ. महेश साळुंखे, डॉ. आर. जे. देशमुख, डॉ. इरान्ना उडचान, डॉ. एस. बी. चव्हाण, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. पी. डी. पाटील आदी उपस्थित होते.

**क्वॉलीटी एज्युकेशन प्रोग्रॅम**

तंत्रज्ञान अधिविभागात गेट परीक्षेचे ट्रेनिंग, प्रोजेक्ट स्पॉन्सरशिप, पेपर पब्लिकेशन शुल्क आदी सुविधा विद्यार्थ्यांना दिल्या जातात. वेल एज्युकेटेड स्टाफ असल्याने जास्तीत जास्त संशोधनावर भर दिला जातो. त्यामुळे येथून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी नोकरी व व्यवसाय करतात.

लोकमत

# देश विकासात अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची : जय बागी

## इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातर्फे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोणत्याही गोष्टीच्या निर्मितीमध्ये अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळेच देशाच्या विकासात अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा फायदा समाजातील शेवटच्या घटकालाही होतो. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर देश, विदेशांत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. जयदीप बागी यांनी केले.

केशवराव भोसले नाट्यगृहात रविवारी दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातर्फे 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया आणि करिअरच्या संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे चेअरमन डॉ. पी. व्ही. कडोले होते.

डॉ. बागी म्हणाले, कृषी तंत्रज्ञान,



कोल्हापुरातील केशवराव भोसले नाट्यगृहात रविवारी आयोजित व्याख्यानात डॉ. जयदीप बागी यांनी मार्गदर्शन केले.

संरक्षणासाठी अत्याधुनिक शस्त्रसामग्री, दळणवळणाची साधने, माहिती, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांचा विकास, सर्वच क्षेत्रातील मूलभूत संशोधन अभियंते करीत असतात. मूलभूत, नावीन्यपूर्ण अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च शिक्षण देणारा स्वत:चा वेगळा अधिविभाग असणारे शिवाजी विद्यापीठ राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.

यावेळी प्रा. पी. ए. प्रभू यांनी अभियांत्रिकी प्रवेशाबद्दलची माहिती दिली. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश दिला जातो. सीईटीचा निकाल लागल्यानंतर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु होईल. ऑनलाईन अर्ज कसा करायचा, महाविद्यालयांचे पर्याय कसे निवडायचे, याबाबतची सविस्तर माहितीही त्यांनी दिली. यावेळी दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे कोल्हापूर सेंटर अध्यक्ष डॉ. पी. व्ही. कडोले, सचिव मनोज चव्हाण, पी. बी. देशपांडे, एस. एम. खतकल्ले, डॉ. महेश साळुंखे, डॉ. आर. जे. देशमुख, डॉ. इराना उडचान, डॉ. एस. बी. चव्हाण डॉ ए बी कोळेकर डॉ पी.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी उर्दू
एल. एड्.च्या अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या
परीक्षेत किमान ४९.५० टक्के गुण सर्वसाधारण उमे

लोकमत





१) डेक्कन स्पोर्टस्तर्फे पश्चिम महाराष्ट्रात भरविण्यात आलेल्या डेक्कन सायक्लोथॉन स्पर्धेतील १२० कि.मी. अंतराच्या स्पर्धेचा फ्लॅग ऑफ मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते रविवारी सकाळी झाला. यावेळी विश्वविजय खानविलकर, उदय पाटील, विजय जाधव, आदी उपस्थित होते. २) डेक्कन स्पोर्टस्तर्फे पश्चिम महाराष्ट्रात भरविण्यात आलेल्या डेक्कन सायक्लोथॉनमध्ये २० कि.मी. स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविलेल्या पृथ्वीराज शहापुरे यास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विजय जाधव, विश्वविजय खानविलकर, उदय पाटील, जयेश कदम, वैभव बेळगावकर, अभिषेक मोहिते, आदी उपस्थित होते.

## डेक्कन सायक्लोथॉन : देशभरातील ३०० स्पर्धकांची हजेरी; महिलांमध्ये सुमित्रा खानविलकर यांची बाजी

# सांगलीचे दिलीप माने ठरले सिकंदर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केलेल्या डेक्कन सायक्लोथॉन स्पर्धेच्या खुल्या गटात रविवारी सकाळी झालेल्या १२० किलोमीटर शर्यतीमध्ये सांगलीच्या दिलीप माने याने प्रथम क्रमांक पटकाविला. माने याने शिवाजी विद्यापीठ ते संकेश्वर ते परत शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी असे अंतर सर्वांत कमी वेळेत पूर्ण केले. यासोबतच विविध गटांत हेमंत लोहार, प्रतीक्षा चौगुले, नितीन नारगोलकर, उज्ज्वल ठाणेकर, श्रुती कुंभोजे, सुमित्रा खानविलकर, सुधीर नकाते (सर्व कोल्हापूर); तर रमा जाधव, शिल्पा दाते (सांगली), अंजली भालिंगे (पुणे) या सायकलपटूंनीही आपापल्या गटात बाजी मारत प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेतील निकाल असे, १२० कि.मी. (शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी ते संकेश्वर, पुन्हा शिवाजी विद्यापीठ) - पुरुषांमध्ये दिलीप माने (सांगली), सुदर्शन देवडीकर (कोल्हापूर), प्रकाश ओलेकर (सांगली), वेदान्त हेलर्नेकर (पुणे), अ‍ॅरॉन केन (लंडन, सध्या रा. पुणे), फ्लॉक नेल्सन (पल्लीतुरा, केरळ), अभिनात मुरली (केरळ), केवल्य सनमुद्रा (पुणे).

५० कि.मी. (पुरुष) - शिवाजी विद्यापीठ ते अप्पाचीवाडी ते पुन्हा शिवाजी विद्यापीठ) - हेमंत लोहार (कोल्हापूर), किरण बंडगर (सांगली), सिद्धेश पाटील (कोल्हापूर); तर महिलांमध्ये १६ ते ३६ वयोगट - प्रतीक्षा चौगुले (कोल्हापूर), निशाकुमारी यादव (सांगली), मानवी पाटील (गडहिंग्लज).

३६ ते ५० वयोगट - रमा जाधव (सांगली), साजीद सय्यद (सांगली), जॉर्ज थॉमस (कऱ्हाड). ५० वर्षांवरील गट - नितीन नारगोलकर (कोल्हापूर), राम बेळगावकर (कोल्हापूर), जीवदास शहा (सातारा). महिलांमध्ये शिल्पा दाते (सांगली), नेहा टिकम (पुणे), सचित्रा काटे (कोल्हापूर). ५० वर्षांवरील - अंजली भालिंगे (पुणे).



डेक्कन स्पोर्टस्तर्फे पश्चिम महाराष्ट्रात रविवारी सकाळी शिवाजी विद्यापीठ ते संकेश्वर पुन्हा शिवाजी विद्यापीठ अशा मार्गावर भरविण्यात आलेल्या डेक्कन सायक्लोथॉन स्पर्धेतील एक क्षण.

२० कि.मी. - शिवाजी विद्यापीठ ते पंचतारांकित एमआयडीसी, पुन्हा शिवाजी विद्यापीठ - १५ ते ३० वयोगट- श्रुती कुंभोजे (साजणी). ३० ते ५० वयोगट - सुमित्रा विश्वविजय खानविलकर (कोल्हापूर), आरती संघवी (कोल्हापूर).

स्पर्धेचे उद्घाटन के. एस. ए.चे अध्यक्ष मालोजीराजे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख, कोल्हापूर जिल्हा सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष विजय जाधव, डेक्कन स्पोर्टस्‌चे अध्यक्ष उदय पाटील, उपाध्यक्ष जयेश कदम, वैभव बेळगावकर, अभिषेक मोहिते, अतुल पोवार, अमर धामणे, संजय चव्हाण, प्रशांत काटे, समीर चौगले, राज लिंग्रस, आदी उपस्थित होते. स्पर्धेचा बक्षीस समारंभ महापौर सरिता मोरे व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाला.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विजय जाधव, विश्वविजय खानविलकर, उदय पाटील, जयेश कदम, वैभव बेळगावकर, अभिषेक मोहिते, आदी उपस्थित होते.

### सायकलिंगचा टक्का वाढू लागला

पर्यावरणाचा समतोल असलेले विनाखर्चाचे वाहन म्हणून सायकल हा सर्वोत्तम पर्याय ठरत आहे. याशिवाय सर्वोत्तम व्यायाम म्हणूनही सायकलिंगकडे पाहिले जाते. त्यामुळे सायकलिंगचा टक्का शहरासह जिल्ह्यात वाढू लागला आहे. त्याचा परिपाक म्हणून चेन्नई, गुजरात, आंध्रप्रदेश, हरियाणा, बंगलोर, महाराष्ट्रसह कोल्हापुरातील सायकलपटूंनीही या स्पर्धेला उदंड प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे उद्घाटक म्हणून लाभलेले मालोजीराजे छत्रपती व त्यांचे मेहुणे विश्वविजय खानविलकर, उद्योजक रवींद्र पाटील-सडोलीकर, करवीरचे पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांनी भाग घेऊन ५० कि.मी. अंतराची स्पर्धा पूर्ण केली. याशिवाय लंडनमधील अ‍ॅरॉन केन हा परदेशी पाहुणाही या स्पर्धेत सहभागी झाला होता. त्याने १२० कि.मी. स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकाविला. पंच म्हणून असोसिएशनचे अध्यक्ष विजय जाधव यांनी काम पाहिले. स्पर्धा मार्गात चार रुग्णवाहिकांसह आठ डॉक्टर व १२० स्वयंसेवक कार्यरत होते. स्पर्धा संपल्यानंतर सायकलपटूंना फिजिओथेरपी, स्ट्रेचिंगच्या प्रात्यक्षिकासंह मार्गदर्शन करण्यात आले.